**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 नुसार जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी अधिसूचित करणेबाबत.**

# नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
## सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रमांक साप्रवि/आस्था-6/245 ते 280/2022, दिनांक 14/03/2022

**वाचा** :- 1) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015, दिनांक 28 एप्रिल 2015.
2) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015, दिनांक 16 फेब्रुवारी 2019.
3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीएस-2018/प्र.क्र.145/आस्था-5, दिनांक 13 फेब्रुवारी 2019.

## परिपत्रक

ज्याअर्थी उक्त वाचा क्र. 1 चे अधिसुचनेतील नमुद तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता आणि पात्र व्यक्तींनी लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी एक सर्वसमावेशक असा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 कायदा अंमलात आलेला आहे. त्यानुसार वाचा क्र. 2 चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 अंतर्गत लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी अधिसूचित करण्यात आल्याबाबत निर्गमित करणेत आलेल्या अधिसूचनेची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्याअर्थी जिल्हा परिषद, नाशिक मार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 अंतर्गत समवेतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद केलेल्या अनुसूचीमध्ये जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत सर्व संवर्गातील कार्यरत गट क व गट ड कर्मचारी यांना एकुण 12 सेवा पुरविणेस सदर परिपत्रकान्वये मान्यता देणेत येत आहे. सदर सेवा/प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचारी यांची राहील.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम व वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये कार्यपध्दतीनुसार संबंधित विभागांनी कार्यवाही करणे आवश्यक राहील.

Leena Bansod

**लीना बनसोड** (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी -**
1) खातेप्रमुख --------------------(सर्व), जिल्हा परिषद नाशिक /गटविकास अधिकारी
2) गटविकास अधिकारी, पंचायत समिती --------------------(सर्व),

**प्रत** :- सर्व संकलन/साप्रवि, जिल्हा परिषद, नाशिक
**प्रत** :- कार्यालयीन ज्ञापन नस्ती/साप्रवि

# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक विभागाच्या सेवा

## "परिशिष्ट-अ"

| अ. क्र. | लोकसेवेचे नांव | लोकसेवा पुरविण्यासाठीची कार्यमर्यादा (कामकाजाचे दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | द्वितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | परिविक्षाधीन कालावधी | पात्र झालेनंतर 1 महिना | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 2 | स्थायित्व प्रमाणपत्र | पात्र झालेनंतर 1 महिना | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 3 | 50/55 वर्षे पुर्नविलोकन आढावा | प्रतिवर्षी माहे सप्टेंबर | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 4 | मराठी / हिंदी भाषा परिक्षा सूट | पात्र झालेनंतर 1 महिना | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 5 | संगणक अर्हता परिक्षा सूट | पात्र झालेनंतर 1 महिना | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 6 | वेतन प्रमाणपत्र | पात्र झालेनंतर 15 दिवस | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 7 | भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र | कर्मचाऱ्यांने अर्ज केल्यानंतर 15 दिवस | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 8 | तात्पुरती सेवा जेष्ठता यादी | प्रति वर्षी 01 जानेवारी | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 9 | अंतिम सेवा जेष्ठता यादी | प्रती वर्षी 31 मार्च | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 10 | मुळ सेवापुस्तकातील नामनिर्देशन अद्यावत | कर्मचाऱ्यांने अर्ज केल्यानंतर 15 दिवस | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 11 | दुय्यम सेवा पुस्तके अद्ययावतीकरण | कर्मचाऱ्यांने अर्ज केल्यानंतर 15 दिवस | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |
| 12 | कर्मचाऱ्यांना गोपनीय अहवालाची प्रत देणे | कर्मचाऱ्यांने अर्ज केल्यानंतर 7 दिवस | संबंधित विभागाचे सप्रअ / कप्रअ | संबंधित खातेप्रमुख | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) |

Leena M Bansod

**लीना बनसोड (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**